




# दैनिक आकर्षण

संपादक : विजय सांगळे








वर्ष ६ ▪ अंक २७ ▪ शुक्रवार १६ ऑक्टोबर २०२६ ▪ पाने ४ मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322




सोमवंशी क्षत्रिय कासार समाज,
श्री कालिका देवी, अहिल्यानगर
माळ पाचवी वाहन : मयुर
मूर्तीकार : श्री धनंजय वेळापुरे.
छाया : विशाल येंडे.

## शेवगाव, पाथर्डी व पारनेरमध्ये गुटखा विक्रेत्यांवर एलसीबीचे छापे

### एक लाख ६२ हजारांचा मुद्देमाल जप्त



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार, स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकांनी शेवगाव, पारनेर आणि पाथर्डी पोलीस ठाण्याच्या हद्दीत एकाच दिवशी तब्बल ४ ठिकाणी छापे टाकून सुगंधीत तंबाखू, मावा आणि बेकायदेशीर गुटखा विक्री करणाऱ्या अड्ड्यांवरून एकूण १ लाख ६२ हजार १६६ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी या अवैध धंद्यांची गुप्त माहिती काढून कारवाईसाठी पोलिसांची तीन विशेष पथके तयार केली होती. या पथकांनी १५ ऑक्टोबर रोजी संबंधित ठिकाणी एकाच वेळी धाडी टाकल्या. या कारवाईत पाथर्डी तालुक्यात सर्वात मोठा छापा टाकण्यात आला असून, खरवंडी कासार येथे शहादेव जगताप याच्याकडून १ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणातील दुसरा आरोपी नवनाथ जगताप हा फरार झाला आहे.

शेवगाव येथे टाकलेल्या छाप्यात १४,५०० रुपयांच्या मुद्देमालासह पांडुरंग कातकडे याला पकडण्यात आले असून मुजीब शेख हा पसार झाला आहे. पारनेर पोलीस ठाण्याच्या हद्दीत दोन स्वतंत्र कारवायांमध्ये एकूण ७ हजार ६६६ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. यात विलास शेंडकर, समीर शेख आणि अशोक निघुट यांच्यावर भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांखाली गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पारनेरमधील गुन्ह्यात अर्जुन यादव (रा. जुन्नर, जि. पुणे) हा अद्याप फरार आहे. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे अंमलदार बाळासाहेब नागरगोजे, अरुण गांगुर्डे, अशोक लिपणे, योगेश कर्डीले यांच्यासह इतर पोलीस कर्मचाऱ्यांच्या पथकाने पार पाडली.

## अवैध दारू विक्रीवर कारवाईत साडेसात लाखांचा मुद्देमाल जप्त

### एलसीबीचे बेलवंडी, पाथर्डी, सोनई व श्रीगोंद्यात छापे

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** स्थानिक गुन्हे शाखेने १५ ऑक्टोबर रोजी बेलवंडी, पाथर्डी, सोनई आणि श्रीगोंदा या चार पोलीस ठाण्यांच्या हद्दीत एकाच वेळी छापे टाकून अवैध देशी-विदेशी दारू विक्रेत्यांवर कारवाई केली. या कारवाईत एकूण ४ गुन्हे दाखल करण्यात आले असून, तब्बल ७ लाख ५६ हजार ४९० रुपये किमतीचा मुद्देमाल
जप्त करण्यात आला आहे.



पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या नेतृत्वाखाली ही विशेष मोहीम राबविण्यात आली. एलसीबीचे सपोनि हरिष भोये, पोउपनि कृष्णकुमार सेदवाड यांच्यासह प्रताप देवकाते, अमोल कोतकर आणि इतर पोलीस अंमलदारांची चार पथके तयार करून रवाना करण्यात आली होती. ▪ पान ४ वर

## दोघा सराईत दुचाकीचोरांना कोतवाली पोलिसांकडून बेड्या

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** शहरातील वाढत्या दुचाकी चोरीच्या घटनांना आळा घालण्यात कोतवाली पोलिसांना मोठे यश आले आहे. पोलिसांनी वेगवेगळ्या कारवायांमध्ये दोन सराईत चोरट्यांना अटक करून त्यांच्याकडून एकूण १ लाख ५५ हजार रुपये किमतीच्या ३ दुचाकी हस्तगत केल्या आहेत. मार्केट यार्ड परिसरातील त्रिमुखे हॉस्पिटलसमोरून ६ ऑक्टोबर रोजी वैभव साळवे यांची ८० हजार रुपये किमतीची सुझुकी ॲक्सेस (एमएच १३ इए.३४८३) चोरीला ▪ पान ४ वर

## पारनेर शहरात १ कोटी ७५ लाखांच्या विकासकामांचे सोमवारी भूमिपूजन

### राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर यांची माहिती

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पारनेर–** पारनेर शहरातील रस्ते विकासाला चालना देण्यासाठी आमदार काशिनाथ दाते सर यांच्या विशेष प्रयत्नांतून मंजूर झालेल्या एकूण १ कोटी ७५ लाख रुपयांच्या विविध विकासकामांचा भूमिपूजन समारंभ सोमवार दि. १९ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता पारनेर शहरात आयोजित करण्यात आला आहे. या कामांचा भूमिपूजन समारंभ राज्याचे जलसंपदामंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री मा. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या शुभहस्ते, तर आमदार काशिनाथ दाते सर यांच्या अध्यक्षतेखाली होणार असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर यांनी दिली.



या विकासकामांमध्ये पारनेर नगरपंचायतीच्या प्रभाग क्रमांक २ मधील व्यवहारें वस्ती ते साहेबराव गायकवाड वस्ती रस्त्याचे काँक्रिटीकरण करण्यासाठी २० लाख रुपये, तर प्रभाग क्रमांक ३ मधील जामगाव रस्त्यापासून विजय औटी घरापर्यंत रस्ता करण्यासाठी ४० लाख रुपये मंजूर आहेत. तसेच जामगाव रोड ते औटी वस्ती ते तराळवाडी रस्त्याचे काँक्रिटीकरण करण्यासाठी १५ लाख रुपये, महाजन वस्ती ते दादाभाऊ गायकवाड घर रस्त्याचे डांबरीकरण करण्यासाठी २० लाख रुपये, लोणी रोड ते अंबुले वस्ती रस्त्याचे काँक्रिटीकरण करण्यासाठी ४० लाख रुपये, तसेच जामगाव रस्त्यापासून तराळवाडी मारुती मंदिर रस्त्याची सुधारणा करण्यासाठी ४० लाख रुपये अशी एकूण १ कोटी ७५ लाख रुपयांची कामे प्रस्तावित आहेत.

या कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेसचे अहिल्यानगर दक्षिण जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत, भाजपचे राज्य कार्यकारिणी सदस्य विश्वनाथ कोरडे, भाजप मंडलाध्यक्ष राहुल शिंदे, मा. नगराध्यक्ष विजय औटी, जिल्हा सहकारी बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर, माजी जिल्हा परिषद सदस्य वसंतराव चेडे, उद्योजक दिलीप दाते, युवक तालुकाध्यक्ष भास्कर उचाळे, माजी उपनगराध्यक्ष दत्तात्रय कुलट, शहराध्यक्ष राजूशेठ औटी, महिला तालुकाध्यक्षा सुषमा रावडे, युवती तालुकाध्यक्षा अपर्णा खामकर, महिला शहराध्यक्षा कविता औटी, नगरसेवक अशोकराव चेडे, पैलवान युवराज पठारे, नगरसेवक नवनाथ सोबले, नगरसेविका शालूबाई कांतीलाल ठाणगे, नगरसेविका नीता देवराम ठुबे आणि शहर उपाध्यक्ष सुनील गाडगे यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, नगरसेवक, विविध संस्थांचे पदाधिकारी, तरुण मित्र मंडळांचे सदस्य व पारनेर शहरातील नागरिक उपस्थित राहणार आहेत.

पारनेर शहरातील मूलभूत सुविधांचा विकास आणि नागरिकांना चांगल्या दर्जाचे रस्ते उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने या कामांना महत्त्व आहे. नागरिकांनी भूमिपूजन समारंभास उपस्थित राहावे, असे आवाहन महायुतीच्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## कोटक महिंद्रा बँकेतील अपहारप्रकरणी चार वर्षांपासून फरार आरोपी बेलवंडी पोलिसांच्या जाळ्यात!

### कर्जदारांकडून हप्ते वसूल करून बँकेत भरले नाहीत; ७ लाख ३१ हजार ९२० रुपयांच्या अपहाराचे प्रकरण

दैनिक आकर्षण । केशव कातोरे

**बेलवंडी –** कोटक महिंद्रा बँकेच्या नागापूर शाखेतील कर्जदारांकडून कर्जाचे हप्ते वसूल करून ते बँकेत जमा न करता अपहार केल्याच्या आरोपावरून चार वर्षांपासून फरार असलेल्या सागर तुळशीराम शिंदे (रा. ढवळगाव, ता. श्रीगोंदा) याला बेलवंडी पोलिसांनी अटक केली आहे. गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून ही कारवाई केली. या प्रकरणात एकूण ७ लाख ३१ हजार ९२० रुपयांच्या अपहाराचा आरोप आहे.

नेमके प्रकरण काय?

कोटक महिंद्रा बँकेच्या नागापूर शाखेचे व्यवस्थापक संजय रघुनाथ भंडारे यांच्या फिर्यादीवरून याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. सागर शिंदे आणि गोविंद



बबन गाडे (रा. कांबी, ता. शेवगाव) हे दोघे बँकेत कलेक्शन एक्झिक्युटिव्ह म्हणून कार्यरत होते. मे २०२३ ते ऑगस्ट २०२३ या कालावधीत त्यांनी विविध कर्जदारांकडून कर्जाच्या हप्त्यांची रक्कम रोख स्वरूपात वसूल केली. ▪ पान ४ वर

## विद्याधामच्या मुलींचा कबड्डी स्पर्धेत डंका!

### १४ वर्षांखालील मुलींच्या संघाला विजेतेपद; १९ वर्षांचा संघ उपविजेता

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**बेलवंडी –** श्रीगोंदा तालुक्यातील देवदैठण येथील श्री संतश्रेष्ठ निंबराज महाराज विद्याधाम प्रशालेच्या मुलींनी तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेत आपल्या जिगरबाज खेळाची छाप पाडली. १४ वर्षांखालील मुलींच्या संघाने विजेतेपद पटकावले, तर १९ वर्षांखालील मुलींच्या संघाने उपविजेतेपद मिळवून प्रशालेच्या क्रीडा यशात आणखी एक मानाचा तुरा रोवला. अहिल्यानगर जिल्हा क्रीडा कार्यालय आणि श्रीगोंदा तालुका क्रीडा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीगोंदा येथील महाराजा जिवाजीराव कॉलेजमध्ये तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत विद्याधामच्या खेळाडूंनी उत्कृष्ट सांघिक कामगिरी करत प्रतिस्पर्धी संघांना जोरदार टक्कर दिली.

आक्रमण आणि बचावाच्या जोरावर विजेतेपद!

१४ वर्षांखालील मुलींच्या संघाने आक्रमण आणि बचाव यांचा सुरेख मेळ साधत येवती, घोगरगाव, खांडगाव आणि कोळगाव या संघांचा पराभव केला. दमदार खेळाच्या जोरावर विजेतेपदावर नाव कोरत या संघाने जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी आपली पात्रता सिद्ध केली. या विजयी संघात राजलक्ष्मी चव्हाण, श्रावणी सातव, तन्वी जाधव, ज्ञानेश्वरी सावंत, कार्तिकी वाखारे, वेदिका ढवळे, कल्याणी आढाव, श्रेया कावरे, कार्तिकी कोकाटे आणि प्राची औटी यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. हा संघ आता अकोले येथे होणाऱ्या जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत श्रीगोंदा तालुक्याचे ▪ पान ४ वर

## पाणीटंचाईचे संकट टाळण्यासाठी प्रत्येकाने पाणी बचतीचा संकल्प करावा - नगरसेवक निखिल वारे

### दुष्काळाचे सावट दूर होण्यासाठी श्री तुळजाभवानी मातेच्या चरणी प्रार्थना । पाईपलाईन रोडवरील श्री तुळजाभवानी मंदिरात महाआरती; सलग दुसऱ्यांदा यूपीएससी उत्तीर्ण सिद्धार्थ तागड यांचा सन्मान

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त पाईपलाईन रोड येथील श्री तुळजाभवानी माता मंदिरात दुष्काळाचे सावट लवकरात लवकर दूर व्हावे आणि नागरिकांवरील पाणीटंचाईचे संकट टळावे, यासाठी भाविकांनी श्री तुळजाभवानी मातेच्या चरणी प्रार्थना केली. यावेळी मातेच्या जयघोषाने मंदिर परिसर भक्तिमय झाला. नगरसेविका गौरी अजिंक्य बोरकर, नगरसेवक निखिल वारे आणि उद्योजक मच्छिंद्र इंगळे यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली.

यावेळी श्री तुळजाभवानी मंदिर देवस्थानच्या वतीने सिद्धार्थ लक्ष्मण तागड यांनी सलग दुसऱ्यांदा यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण केल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यांच्या यशाचे कौतुक करून इतर विद्यार्थ्यांनीही त्यांच्याकडून प्रेरणा घ्यावी, असे आवाहन करण्यात आले.



नगरसेवक निखिल वारे म्हणाले की, दुष्काळाचे सावट गंभीर असून आगामी काळात पाणीटंचाई मोठ्या प्रमाणात जाणवण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने पाणी बचतीचा संकल्प करणे आवश्यक आहे. १९७२ च्या दुष्काळात अन्नधान्याची टंचाई निर्माण झाली होती. यंदाच्या परिस्थितीत पाण्याचे मोठे संकट उभे राहण्याची भीती आहे. त्यामुळे नागरिकांनी आतापासूनच पाण्याचा काटकसरीने वापर करावा.

शहरात पाणीपुरवठा झाल्यानंतर घरातील पाणी विनाकारण फेकून न देता त्याचा योग्य वापर करावा. पाण्याचा प्रत्येक थेंब महत्त्वाचा असून, पाण्याची बचत केल्यास संभाव्य संकटाची तीव्रता कमी करण्यास मदत होईल, असे आवाहन वारे यांनी केले.

नगरसेविका गौरी अजिंक्य बोरकर म्हणाल्या की, पाईपलाईन रोडवरील श्री तुळजाभवानी माता मंदिर हे भाविकांचे श्रद्धास्थान आहे. येथे दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविक येत असतात. देवस्थानाच्या वतीने भाविकांना चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

सलग दुसऱ्यांदा यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या सिद्धार्थ तागड यांचा देवस्थानाच्या वतीने सन्मान करण्यात आला, ही अभिमानाची बाब आहे. इतर विद्यार्थ्यांनीही त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन शिक्षणाच्या क्षेत्रात यश मिळवावे आणि आपल्या शहराचे नाव उज्ज्वल करावे, असे आवाहन बोरकर यांनी केले.

यावेळी देवस्थानचे संस्थापक अशोक कानडे, अशोक गायकवाड, लतिका पवार, मंथन तागड, लक्ष्मण तागड, धवल इंगळे, ओमप्रकाश तिवारी, गोपाळ सजवले, नवनाथ आंधळे, दत्तात्रय तांबे, स्मिता शितोळे आदी उपस्थित होते.

## दै. आकर्षण निवडक

### डॉ.सुदर्शन धस यांच्या कथा संग्रहाला मराठी बालकुमार साहित्य सभेचा पुरस्कार जाहीर



अहिल्यानगर - येथील साहित्यिक डॉ.सुदर्शन धस यांच्या " नकली सिंहाची धमाल " या बालकथा संग्रहाला मराठी बालकुमार साहित्य सभा, कोल्हापूर यांचा २०२५ या वर्षाचा साहित्य पुरस्कार जाहीर झाला आहे. डॉ. सुदर्शन धस हे रयत शिक्षण संस्थेमध्ये मुख्याध्यापक म्हणून कार्यरत असून विविध वृत्तपत्रे , मासिके व दिवाळी अंक यामधून त्यांचे विविधांगी लेखन सातत्याने प्रकाशित झालेले आहे. यापूर्वी त्यांच्या दोन पुस्तकांना राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार लाभलेले आहेत. " आनंदाने गाऊया " या त्यांच्या विद्यार्थीप्रिय बालकविता संग्रहाची महाराष्ट्र शासन - ग्रंथ निवड समितीमार्फत शासनमान्य ग्रंथांच्या यादीत शिफारस करण्यात आलेली आहे. " नकली सिंहाची धमाल " हा बालकथा संग्रह बालवाचकांमध्ये अतिशय लोकप्रिय असून , सदर पुरस्काराबद्दल विविध मान्यवरांनी डॉ. धस यांचे अभिनंदन केले आहे.

### सावित्रीबाई फुले उर्दू कन्या शाळेत वाचन प्रेरणा दिन साजरा



अहिल्यानगर- मोहम्मदिया एज्युकेशन सोसायटीच्या मुकुंदनगर येथील सावित्रीबाई फुले उर्दू कन्या शाळेत भारताचे माजी राष्ट्रपती, थोर शास्त्रज्ञ व भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी डॉ. कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले.यावेळी बोलताना संस्थेचे संस्थापक डॉ. प्रा.अब्दुस सलाम सर म्हणाले की,विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, ज्ञानाची व्याप्ती वाढावी आणि पुस्तकांच्या माध्यमातून विचारशक्ती व कल्पनाशक्ती विकसित व्हावी, या उद्देशाने वाचनाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. डॉ.कलाम यांचे जीवन आपल्याला मोठी स्वप्ने पाहण्याची आणि ती पूर्ण करण्यासाठी कठोर परिश्रम करण्याची प्रेरणा देते. त्यांना पुस्तके वाचण्याची खूप आवड होती. त्यांनी आपल्या ज्ञानाच्या आणि मेहनतीच्या बळावर देशाच्या प्रगतीमध्ये मोलाचे योगदान दिले.पुस्तक हे आपले खरे मित्र आहे. पुस्तकांमुळे आपल्याला नवनवीन गोष्टी शिकायला मिळतात, आपले विचार समृद्ध होतात आणि आत्मविश्वास वाढतो. म्हणूनच आपण दररोज काही वेळ वाचनासाठी दिला पाहिजे. पाठ्यपुस्तकांसोबतच गोष्टींची पुस्तके, चरित्रे, वर्तमानपत्रे आणि ज्ञानवर्धक साहित्यही वाचले पाहिजे.असे आवाहन केले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मखदूम एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटीचे अध्यक्ष आबीद दुलेखान, मुख्याध्यापक जमीर शेख, मुख्याध्यापक सय्यद नौशाद अहमद, शेख फरजाना दिलावर, शेख असलम युसुफ पटेल, शेख शाहीन मोहम्मद इसाक, शेख हिना अब्दुल कुद्दुस, शेख सुलताना अब्दुल लतीफ, फरहा बाजी, अमरीन बाजी आदी उपस्थित होते.

## तिळवण तेली समाज ट्रस्टच्या दाळ मंडईतील मंदिरात नवरात्रउत्सवानिमित्त देवीची विविध रूपे साकार



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** तिळवण तेली समाज ट्रस्टच्या वतीने नवरात्रोत्सवानिमित्त दाळ मंडई येथील श्री संताजी भवन येथे श्री विठ्ठल–रुक्मिणी मंदिरात देवीची विविध आकर्षक रूपे साकारण्यात येत आहेत. नवरात्रोत्सवाच्या प्रत्येक दिवशी देवीची वेगवेगळ्या स्वरूपांत सजावट केली जात असून, या देखण्या रूपांचे दर्शन घेण्यासाठी मंदिरात भाविकांची मोठी गर्दी होत आहे. धार्मिक श्रद्धा, भक्तिभाव आणि आकर्षक सजावटीमुळे मंदिर परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने तिळवण तेली समाज ट्रस्टच्या वतीने दररोज देवीच्या रूपात वैविध्य जपण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. यामध्ये हत्तीवर विराजमान देवी, कमळावर विराजमान देवी, चंद्रावर विराजमान देवी आणि मोरावर विराजमान देवी अशा विविध रूपांची आकर्षक मांडणी करण्यात आली आहे. तसेच तुळजापूर येथील देवीच्या स्वरूपावर आधारित विशेष सजावटही करण्यात आली आहे. प्रत्येक दिवशी देवीचे वेगळे रूप भाविकांना पाहायला मिळत असल्याने दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांमध्ये उत्सुकता दिसून येत आहे. देवीची आकर्षक सजावट, सुबक मांडणी आणि धार्मिक वातावरण यामुळे मंदिरात भक्तिमय वातावरण अनुभवायला मिळत आहे. लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत अनेक भाविक देवीच्या दर्शनासाठी येत असून, सजावटीचे कौतुकही केले जात आहे.

तिळवण तेली समाज ट्रस्ट च्या अध्यक्षा सौ. नीता लोखंडे म्हणाल्या की, "नवरात्रोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव नसून समाजातील एकोपा, श्रद्धा आणि संस्कृती जपण्याची संधी आहे. देवीची विविध रूपे साकारण्यामागे भाविकांना दररोज काहीतरी वेगळे आणि आकर्षक पाहायला मिळावे, हा उद्देश आहे. समाजातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि सदस्यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. धार्मिक परंपरा पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे, समाजातील बंधुभाव वाढविणे आणि सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून समाजाचा विकास साधणे, हे ट्रस्टचे प्रमुख ध्येय आहे. भाविकांचा मिळणारा प्रतिसाद आम्हाला अधिक चांगले उपक्रम राबविण्यासाठी प्रेरणा देतो. 'समाजाचा विकास हा एकच ध्यास' या विचारातून ट्रस्ट यापुढेही विविध सामाजिक आणि धार्मिक उपक्रम राबविण्यासाठी प्रयत्नशील राहील."

## 'लोक हक्क फाउंडेशन'ची त्रैमासिक सभा २४ ऑक्टोबरला सराला येथे माजी आमदार लहू कानडे यांचे उपस्थित राहण्याचे आवाहन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**श्रीरामपूर–** लोक हक्क फाउंडेशनची महत्त्वपूर्ण त्रैमासिक सभा शनिवारी, २४ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी 'लोक हक्क भवन' (मु. पो. सराला, ता. श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर) येथे आयोजित करण्यात आली आहे. या सभेला सर्व सन्माननीय सदस्यांनी आवर्जून उपस्थित राहावे, असे नम्र आवाहन लोक हक्क फाउंडेशनचे अध्यक्ष तथा माजी आमदार लहू कानडे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात लहू कानडे यांनी नमूद केले आहे की, मागील सभेला सर्व सदस्यांची लाभलेली उपस्थिती व सहकार्य यामुळे अनेक महत्त्वाचे प्रकल्प यशस्वीरीत्या मार्गी लागले आहेत. त्याबद्दल सर्व सहकाऱ्यांचे आभार मानत त्यांनी पुढील नियोजनाची माहिती दिली.



येत्या २४ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या या सभेमध्ये लोक हक्क फाउंडेशनच्या माध्यमातून सुरू असलेल्या विविध उपक्रमांच्या पुढील वाटचालीचे नियोजन करण्यात येणार आहे. तसेच, सामाजिक हित आणि विकासाच्या दृष्टिकोनातून सदस्यांच्या नवीन संकल्पना व कल्पना प्रत्यक्षात आणण्याबाबत सविस्तर चर्चा केली जाणार आहे.

ही सभा अत्यंत महत्त्वाची असल्याने सर्व पदाधिकारी व सदस्यांनी आपल्या व्यस्त दिनक्रमातून वेळ काढून २४ ऑक्टोबर ही तारीख राखीव ठेवावी आणि सभेला वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन माजी आमदार लहू कानडे यांनी शेवटी केले आहे.

## साखर कारखान्यांच्या थकीत कर्जावरील कारवाई रोखण्यासाठी प्रस्थापित जिल्हा बँकेच्या निवडणुकीत एकत्र

### पारनेर बाजार समितीचे संचालक तरटे यांची घणाघाती टीका

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पारनेर–** उत्तर अहिल्यानगर जिल्ह्यातील सहकारी साखर कारखान्यांकडे असलेली शेकडो कोटी रुपयांच्या कर्जावरील संभाव्य कारवाई रोखण्यासाठी एकमेकांशी विळा भोपळ्याचे सख्य असलेले प्रस्थापित नेते जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीत एकत्र आले आहेत.असा आरोप पारनेर तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) तालुकाध्यक्ष, बाजार समितीचे संचालक बाबासाहेब तरटे यांनी केला आहे. दुष्काळाच्या आडून प्रस्थापितांची झालेली अभद्र युती ही एकेकाळी आशिया खंडात नावाजलेल्या अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेसाठी धोक्याची घंटा असल्याची जळजळीत टीका तरटे यांनी केली. तरटे बिगर शेती मतदारसंघातील जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीत महाविकास आघाडीच्या उमेदवारीचे प्रबळ दावेदार मानले जातात.

यासंदर्भात प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात तरटे यांनी म्हटले आहे की, वास्तविक पाहता अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँक ही जिल्ह्यातील सर्वसामान्य शेतकऱ्यांची कामधेनू आहे.सर्वसामान्य शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर ठेवलेल्या ठेवींच्या बळावरच बँकेने बड्या साखर कारखानदारांना शेकडो कोटींची कर्जे दिली आहेत.

शेतकऱ्यांना दिलेल्या किरकोळ कर्जांची प्रत्येक वर्षी १०० टक्के वसुली करण्यासाठी बँकेचे अधिकारी आग्रही असतात.ते गैर नाही.मात्र दुसरीकडे साखर कारखानदारांकडील कर्ज वसुलीकडे जाणिवपूर्वक दुर्लक्ष केले जाते ही बाब बँकेच्या आर्थिक सुदृढतेसाठी घातक असल्याचे तरटे यांनी पत्रकात म्हटले आहे. शेतकऱ्यांची कामधेनू वाचवण्यासाठी व शेतकरी हित जोपासण्यासाठी महाविकास आघाडीच्या माध्यमातून आपण संचालक मंडळाची निवडणूक लढवण्यास इच्छुक आहोत.

आपणास सहकार क्षेत्रातील कामाचा गेल्या २५ वर्षांचा अनुभव आहे.पारनेर तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचा सभापतीपदी तसेच संचालक म्हणून काम करताना शेतकरी हित जोपासण्यासाठी नेहमीच काम केले आहे.या अनुभवाच्या तसेच जिल्ह्याच्या सहकार क्षेत्रात असलेल्या मित्रपरिवाराच्या बळावर आपण निवडणूक लढवण्याची इच्छा व्यक्त केली आहे. अर्थातच माझ्या उमेदवारीचा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष, ज्येष्ठ नेते शरद पवार, खासदार नीलेश लंके घेणार आहेत.त्यांचा निर्णय आपणासाठी शिरसावंद्य असणार असल्याची पुस्ती तरटे यांनी जोडली.

## डॉ. कलाम यांचे संपूर्ण जीवन शालेय विद्यार्थांसाठी प्रेरणादायी – बाळासाहेब निवडुंगे

### ढोकेश्वर विद्यालयात वाचन प्रेरणा दिन व जागतिक विद्यार्थी दिन उत्साहात साजरा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**टाकळी ढोकेश्वर–** भारत देशाचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे संपूर्ण जीवन रामेश्वरम ते राष्ट्रपती भवन हे अतिशय संघर्षमय होते. सामान्य कुटुंबात जन्मलेल्या डॉ. कलाम हे आपल्या मेहनतीच्या, जिद्दीच्या आणि ज्ञानाच्या बळावर राष्ट्रपती भवनापर्यंत पोहचले. म्हणून त्यांचे जीवन शालेय विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे म्हणून विद्यार्थ्यांनी अग्निपंख हे त्यांचे आत्मचरित्र वाचावे असे प्रतिपादन ढोकेश्वर विद्यालयाचे पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे यांनी केले.

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या ढोकेश्वर विद्यालयात डॉ. कलाम यांच्या जयंती निमित्त वाचन प्रेरणा दिन, हात धुणे दिन व जागतिक विद्यार्थी दिन साजरा करण्यात आला त्या प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून निवडुंगे बोलत होते. कार्यक्रमात




प्रथम डॉ. कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. नंतर विद्यार्थांकडून पुस्तकाचे एक एक पान वाचून घेण्यात आले. कु समृद्धी जांभळकर, कु. स्वरा पायमोडे व चि. धनंजय तांबे यांनी डॉ. कलाम यांच्या जीवनावर भाषण केले. तसेच प्राचार्य बाळासाहेब खिलारी यांनी देखील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शास्त्र समन्वयक अशोक गांगड, कृपा खरे मॅडम, रवींद्र मते सर, यांनी विदयार्थ्यांना मार्गदर्शन केले आणि शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी श्री बाबासाहेब जाधव, संदीप महांडुळे, सुरेखा ठाणगे, नारायण शेळके, निलेश पाचर्णे, श्रीरंग धामणे, कल्पना जाधव, सोनल रोहकले, सुमन वाळुंज, स्वप्निल कदम, श्वेता शिर्के, विष्णू भद्रे, रुपाली घोडके, संदीप खिलारी, रामदास नरवडे, शिरीष राऊत, पवन कुटे, अनुष्का कांबळे, नारायण हरेल, अमोल गोरे, सुनिता घोडके इत्यादी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रिया डव्हणे यांनी केले, प्रास्ताविक व अध्यक्षीय निवड संजना विश्वासराव यांनी केले तर आभार दिनेश वायदंडे यांनी मानले.

## पाच हजारांच्या अग्रीम मदतीवर शेतकरी संघटनांचा संताप; निर्णयाचा निषेध

### घोषणा नकोत, हक्काची मदत द्या!'; तहसीलदारांना विविध शेतकरी संघटनांचे निवेदन



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** दुष्काळ आणि अतिवृष्टीमुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी केवळ पाच हजार रुपयांची अग्रीम मदत देण्याच्या शासनाच्या घोषणेचा विविध शेतकरी संघटनांनी तीव्र निषेध नोंदवला आहे. ही मदत शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष नुकसानीच्या तुलनेत अत्यंत तुटपुंजी असल्याचा आरोप करत शासनाने भरीव आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी तहसीलदार, पैठण यांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे.

पैठण तालुक्यासह विविध भागांत अतिवृष्टी आणि दुष्काळसदृश परिस्थितीमुळे शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. पिकांचे नुकसान, वाढता उत्पादन खर्च, कर्जबाजारीपणा आणि महागाईच्या चक्रात शेतकरी अडकला आहे. अशा परिस्थितीत दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यात पाच हजार रुपये अग्रीम मदत जमा करण्याची घोषणा करण्यात आली आहे. मात्र, शेतीसाठी झालेला खर्च आणि प्रत्यक्ष नुकसान लक्षात घेता ही रक्कम शेतकऱ्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी पुरेशी नसल्याचे संघटनांनी निवेदनात म्हटले आहे.

शासनाने पाच हजार रुपयांच्या तुटपुंज्या मदतीवर समाधान मानण्याऐवजी शेतकऱ्यांच्या नुकसानीचा गांभीर्याने विचार करावा. दिवाळीपूर्वी भरीव आर्थिक मदत जाहीर करून तिचे प्रत्यक्ष वाटप करावे, अशी मागणीही करण्यात आली आहे. तसेच नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेतील पात्र लाभार्थ्यांचे प्रलंबित हप्ते तातडीने वितरित करण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली.

**'घोषणा नकोत, हक्काची मदत द्या!'**

निवेदन देताना शेतकरी आणि संघटनांच्या प्रतिनिधींनी शासनाच्या मदतीच्या घोषणेवर नाराजी व्यक्त केली. 'घोषणा नकोत, हक्काची मदत द्या!' आणि 'शेतकरी एकजुटीचा विजय असो!' अशा घोषणा देत शेतकऱ्यांना तातडीने न्याय देण्याची मागणी करण्यात आली.

**या पदाधिकाऱ्यांच्या निवेदनावर सह्या**

या निवेदनावर छावा क्रांतिवीर सेनेचे प्रदेश सरचिटणीस अनिल राऊत, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे माऊली मुळे, छावा संघटनेचे साईनाथ कर्डिले, रामेश्वर बावने, भगवान सोरमारे, सुभाषराव नवथर, महेश पवार, बाळासाहेब काळे, धनंजय गिरी, लक्ष्मण धरम, संजय करंगळ आणि संतोष एडके यांच्यासह शेतकऱ्यांच्या सह्या आहेत.

## ज्येष्ठांच्या आयुष्यात पुन्हा उजळला प्रकाश! फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या पुढाकारातून ३८ जणांना नवदृष्टी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आर्थिक परिस्थितीमुळे डोळ्यांवरील उपचार घेणे शक्य नसलेल्या ज्येष्ठ नागरिकांच्या आयुष्यात पुन्हा प्रकाश आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या माध्यमातून करण्यात आले आहे. जागतिक अंध दिनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित मोफत नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरातून तब्बल ३८ ज्येष्ठ नागरिकांवर पुणे येथे यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आल्या. मोतीबिंदूमुळे दृष्टी अंधुक झालेल्या या ज्येष्ठांना शस्त्रक्रियेनंतर पुन्हा स्पष्ट दिसण्याची आशा मिळाली आहे. बुधवारी (दि. १४ ऑक्टोबर) शस्त्रक्रिया पूर्ण करून अहिल्यानगरमध्ये परतलेल्या ज्येष्ठ नागरिकांचे फिनिक्स सोशल फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर स्वागत केले.

शस्त्रक्रियेनंतर पुन्हा स्पष्ट दिसू लागल्याचा आनंद ज्येष्ठ नागरिकांच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहत होता. अनेक दिवसांपासून दृष्टीच्या समस्येमुळे दैनंदिन कामांसाठी इतरांवर अवलंबून राहावे लागत होते. मात्र, उपचारानंतर दृष्टी सुधारल्याने त्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. आयुष्यातील अंधुकपणा दूर होऊन पुन्हा जगाकडे स्पष्टपणे पाहता येणार असल्याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर जाणवत होता. ज्येष्ठ नागरिकांसाठी हा अनुभव समाधान देणारा आणि



अविस्मरणीय ठरला.

जागतिक अंध दिनाच्या पार्श्वभूमीवर १० ऑक्टोबर रोजी नागरदेवळे येथे फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या वतीने मोफत नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात नागरिकांच्या डोळ्यांची तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान ज्या रुग्णांना मोतीबिंदूची शस्त्रक्रिया आवश्यक असल्याचे आढळले, अशा गरजू रुग्णांना पुढील उपचारांसाठी पुणे येथील के. के. आय. बुधराणी हॉस्पिटलमध्ये पाठविण्यात आले. तेथे ३८ ज्येष्ठ नागरिकांवर मोतीबिंदूच्या शस्त्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण करण्यात आल्या. उपचारानंतर हे ज्येष्ठ नागरिक बुधवारी अहिल्यानगरमध्ये परतले. यावेळी फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे यांनी त्यांचे स्वागत करून त्यांच्या प्रकृतीची व उपचारांनंतरच्या अनुभवांची आस्थेने विचारपूस केली.

## सायबर गुन्ह्यांबाबत पैठण पोलिसांची जनजागृती मोहीम



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** सायबर जनजागृती महिन्याच्या निमित्ताने पैठण पोलीस ठाण्याच्या वतीने नागरिकांमध्ये सायबर गुन्ह्यांविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी विशेष उपक्रम राबविण्यात येत आहे. यासाठी पोलीस ठाण्याच्या शासकीय वाहनावर सायबर गुन्ह्यांचे विविध प्रकार आणि त्यापासून बचाव करण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांची माहिती देणारे बॅनर लावण्यात आले आहेत.

याशिवाय, शासकीय वाहनावर स्पीकर बसवून सायबर गुन्ह्यांविषयी माहिती देणारी १५ मिनिटांची ऑडिओ क्लिप प्रसारित केली जात आहे. पैठण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील महत्त्वाच्या ठिकाणी हे वाहन उभे करून नागरिकांना सायबर फसवणुकीचे प्रकार, त्यापासून बचाव करण्याचे उपाय आणि ऑनलाइन व्यवहार करताना घ्यावयाची काळजी याबाबत माहिती दिली जात आहे.

सध्याच्या डिजिटल युगात ऑनलाइन आर्थिक फसवणूक, बनावट लिंक, अनोळखी व्यक्तींकडून येणारे फोन, ओटीपीची मागणी तसेच सोशल मीडियाच्या माध्यमातून होणाऱ्या फसवणुकीच्या घटनांपासून नागरिकांनी सतर्क राहणे आवश्यक आहे. कोणत्याही अनोळखी व्यक्तीला बँक खात्याची माहिती, एटीएम पिन किंवा ओटीपी देऊ नये, तसेच संशयास्पद लिंकवर क्लिक करणे टाळावे, असे आवाहन या जनजागृती मोहिमेद्वारे करण्यात येत आहे.

## श्री याज्ञवल्क्य नागरी सहकारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** श्री याज्ञवल्क्य नागरी सहकारी पतसंस्था मर्या.अहिल्यानगर ची ३७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात व उत्साहात पार पडली. संस्थेच्या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत संस्थेला प्राप्त झालेल्या "सहकार गौरव पुरस्कारा" बद्दल सभेमध्ये विशेष आनंद व्यक्त करण्यात आला.

संस्थेने आर्थिक शिस्त, पारदर्शक कारभार, सभासद भिमुख सेवा ठेवीवाढ, कर्ज वाटप व कर्ज वसुलीच्या माध्यमातून सहकार क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल सभासदांनी समाधान व्यक्त केले. संस्थेचे चेअरमन सुधीर नारायण मुळे व व्हाईस चेअरमन आनंद स्वामी अशोक




मुळे यांनी सभासदांकडून विचारण्यात आलेल्या प्रश्नांची समाधानकारकपणे उत्तरे दिली. सभेस संचालक मधुसूदन मुळे, रोहित मुळे, नरेंद्र कुलकर्णी, शिल्पा कुलकर्णी, अजित रेखी अतुल देवचक्के, उदय कुलकर्णी, भालचंद्र राजहंस, चंद्रशेखर जोशी शिरीष कुलकर्णी, सुरेखा कमळापूरकर, वैभव कुलकर्णी, राजेंद्र नगरकर, रत्नकर कुलकर्णी, सुधीर पाठक, किशोर कुलकर्णी, अभिजीत मुळे आदींसह सभासद उपस्थित होते.

संस्थेचे नियोजित योजनांची माहिती सांगताना चेअरमन सुधीर मुळे यांनी संस्थेच्या प्रगतीचा आढावा व्यक्त केला. ते म्हणाले की, संस्थेचा सर्व कारभार स्वभांडवलावर आहे. सभासद व हितचिंतक यांनी दाखवलेल्या विश्वासामुळेच पतसंस्थेचा कारभार दिवसेंदिवस वाढत आहे. यावेळी सभेत सभासदांना दहा टक्के लाभांश जाहीर करण्यात आला. तसेच विषय पत्रिकेनुसार सर्व विषय सभेत एकमताने मंजूर झाले.

सीए.अजय बी राजूरकर व सीए. घनश्याम एस सोलंकी यांनी संस्थेच्या कामकाजाच्या दृष्टीने बहुमोल मार्गदर्शन केले. सभासदांच्या वतीने भालचंद्र राजहंस यांनी संस्थेला मिळालेल्या पुरस्काराबद्दल संचालक मंडळ, चेअरमन, संस्थेचे कर्मचारी, व्यवस्थापक या सर्वांचा सत्कार करून अभिनंदन व्यक्त केले.

सभा अत्यंत खेळीमेळीचे वातावरणात पार पडली. संचालिका सौ शिल्पा कुलकर्णी यांनी सभासदांचे आभार मानले. पसायदान व अल्पोपहाराने सभेची सांगता झाली.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

## ज्येष्ठ कवयित्री हेमलता गिते यांचा राष्ट्रीय साहित्यरत्न पुरस्काराने गौरव



अहिल्यानगर- येथील ज्येष्ठ कवयित्री तथा माजी प्राचार्या हेमलता प्रदीप गिते यांना भारतीय सारस्वत मंडळाच्या वतीने राष्ट्रीय साहित्यरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला. मुंबईतील अंधेरी येथे आयोजित राष्ट्रीय लेखणी मराठी साहित्य संमेलनात त्यांना हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. संमेलनाचे अध्यक्ष तथा महाराष्ट्रभूषण साहित्यिक श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते हा सन्मान प्रदान करण्यात आला. सौ. सबनीस आणि सौ.सकटे यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला.या साहित्य संमेलनाला भारतीय सारस्वत मंडळाचे अध्यक्ष सुरेशजी सकट यांच्यासह साहित्य, कला आणि सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. मराठी साहित्याचा उत्कर्ष साधणे, भारतीय साहित्यपरंपरेला अधिक बळकटी देणे आणि साहित्यिकांच्या सर्जनशील कार्याला प्रोत्साहन देणे, या उद्देशाने भारतीय सारस्वत मंडळ कार्यरत आहे. साहित्यिकांच्या योगदानाची योग्य दखल घेऊन पुरस्कारांच्या माध्यमातून त्यांच्या कार्याचा गौरव करणे, हा मंडळाच्या उपक्रमांचा महत्त्वाचा भाग आहे.संमेलनाचे अध्यक्ष साहित्यिक श्रीपाल सबनीस यांनी आपल्या भाषणातून सामाजिक सलोखा, राष्ट्रीय एकात्मता आणि साहित्यिकांची वैचारिक जबाबदारी यांवर महत्त्वपूर्ण विचार मांडले. जाती-पातीच्या आधारे समाजात फूट पाडणारे समाजकारण आणि राजकारण हे मानवाच्या प्रगतीतील मोठे अडथळे असल्याचे त्यांनी नमूद केले. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पंडित जवाहरलाल नेहरू यांसारखे राष्ट्रपुरुष कोणत्याही एका जातीचे किंवा समूहाचे नसून ते संपूर्ण देशाचे आहेत, असे त्यांनी स्पष्ट केले. हे महापुरुष प्रत्येकाचे आहेत, त्यांचे विचार सर्वांसाठी आहेत, ही भावना समाजात रुजणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. कवींनी राष्ट्रहिताच्या कविता लिहाव्यात, तसेच सरकार, व्यवस्था, समाज आणि संस्कृती यांना आवश्यक ते प्रश्न निर्भीडपणे विचारावेत, असे आवाहन त्यांनी साहित्यिकांना केले.

## मंत्रालयात सहकार मंत्र्यांच्या दालनात महत्त्वाची बैठक



अहिल्यानगर - ऊस उत्पादक शेतकरी आणि साखर उद्योगासमोरील विविध अडचणी आणि मागण्यांसंदर्भात सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या दालनात मंत्रालयात एक महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीला माजी मंत्री सदाभाऊ खोत, सहकार विभागाचे सचिव प्रविण दराडे, राज्य साखर आयुक्त संजय कोलते यांच्यासह शिवसेना शेतकरी सेनेचे प्रदेशअध्यक्ष प्रा जालिंदर पाटील, किसान मोर्चा महाराष्ट्राचे सचिव भगवान काटे, शिवसेना पक्षाचे अहिल्यानगरचे अभिजीत अशोकराव पोटे, जय शिवराय किसान संघटनेचे अध्यक्ष शिवाजी माने, शिवसेना शेतकरी सेना महाराष्ट्राचे सचिव जनार्धन पाटील, शरद जोशी शेतकरी संघटना जिल्हा अध्यक्ष ज्ञानदेव पाटील, अहिल्यानगर शेतकरी सेनेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र लोंढे,संजय वाघ,किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष महेश खराडे, जय शिवराय किसान संघटनेचे सदाशिव कुलकर्णी, जय शिवराय किसान संघटनाचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पाटील आदीसह शिष्टमंडळातील शेतकरी प्रतिनिधी व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या बैठकीमध्ये शेतकर्यांच्या प्रमुख मागण्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. उसाला प्रतिटन ५,००० रुपये भाव मिळावा, साखरेची किमान विक्री किंमत () ५० रुपये प्रति किलो करावी, तसेच इथेनॉलचा दर ७५ रुपये प्रति लिटर निश्चित करावा या मागण्यांवर प्रामुख्याने भर देण्यात आला. याशिवाय साखर कारखान्यांमधील वजनकाटे ऑनलाईन करून पारदर्शकता आणावी, या विषयावरही बैठकीत सकारात्मक चर्चा झाली. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी सांगितले की, हे सर्व मुद्दे केंद्र सरकारशी संबंधित असल्याने स्वतः मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्याशी चर्चा करून आजच्या बैठकीला उपस्थित असलेल्या शिष्टमंडळातील शेतकरी प्रतिनिधींना सोबत घेऊन दिल्लीत तातडीने बैठक आयोजित केली जाईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृह व सहकार मंत्री अमित शाह, कृषिमंत्री शिवराजसिंह चव्हाण आणि अन्न व नागरी पुरवठा मंत्री प्रल्हाद जोशी यांच्या उपस्थितीत ही संयुक्त बैठक घेऊन शेतकर्यांच्या प्रश्नांवर कायमस्वरूपी तोडगा काढण्याचा प्रयत्न केला जाईल, असे आश्वासन यावेळी देण्यात आले.

# दुष्काळाचे चटके; माळीवाड्यासह दहा वस्त्यांना टँकरने पाणी द्या



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**शेवगाव–** कमी पाऊस आणि खालावलेली भूजलपातळी यामुळे शेवगाव शहरालगतच्या वाड्या-वस्त्यांमध्ये पाणीटंचाईचे संकट तीव्र झाले आहे. नागरिकांसह पशुधनालाही पाण्यासाठी वणवण करावी लागत असल्याने टंचाईग्रस्त भागांत तातडीने टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करावा, अशी मागणी भाजप युवा मोर्चाचे शहर सरचिटणीस शिवाजी आधाट यांनी केली आहे. यासंदर्भात आमदार मोनिका राजळे आणि नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

माळीवाडा, मगर वस्ती, नागरे वस्ती, गणेशनगर, आढाव वस्ती, बडवे वस्ती, शिंदे वस्ती, शिंगे वस्ती, शेंडे वस्ती आणि खुंटेफळ रोडवरील डाके मळा या दहा भागांत पाणीटंचाईची तीव्रता वाढली आहे. कमी पावसामुळे विहिरींची पाणीपातळी खालावल्याने नागरिकांना दैनंदिन गरजांसाठी पाण्याची जुळवाजुळव करावी लागत आहे.

या परिसरातील अनेक कुटुंबांकडे पशुधन असून, जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न गंभीर बनला आहे. नागरिकांची पाण्यासाठी होणारी धावपळ आणि पशुधनाची गैरसोय लक्षात घेता प्रशासनाने तातडीने टंचाईग्रस्त भागांची पाहणी करून प्रत्यक्ष उपाययोजना कराव्यात, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

केवळ आश्वासनांवर वेळ न घालवता टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करून नागरिकांना दिलासा द्यावा आणि जनावरांसाठीही पाण्याची व्यवस्था करावी, असे आवाहन शिष्टमंडळाने केले. यावेळी नगरसेवक आशुतोष डहाळे, खंडू भाऊ बुलबुले, शाम डाके, दीपक नांगरे यांच्यासह विविध कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते. निवेदनावर अनेकांच्या सह्या आहेत.

# न्यु लॉ कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी सलग दुसऱ्या वर्षी पटकाविला शारदा करंडक



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** प्रेमराज सारडा महाविद्यालयात नुकत्याच वादविवाद वकृत्व स्पर्धा पार पडल्या या स्पर्धांचे महाविद्यालय दरवर्षी आयोजन करते. या स्पर्धामध्ये वरिष्ठ महाविद्यालयीन गटात न्यू लॉ कॉलेजचे बी ए एल एल बी चे विद्यार्थी विद्यार्थिनी सहभागी झाले होते. शारदा करंडक हा अतिशय मानाचा समजला जातो. वादविवाद स्पर्धेत विषय होता झेन झी मुले ही भारतीय सामाजिक परिवर्तनाची सर्वात प्रभावी शक्ती ठरेल.

यामध्ये संपदा लांडगे व विकास ज-हाड या दोघांनी दुसरा क्रमाक मिळवत । कॉलेजचे नाव रोषण केले. मागील वर्षी याच विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक मिळविला होता.

या यशाबद्दल न्यू लॉ कॉलेजच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले. यावेळी कॉलेजचे प्रिन्सिपल तांबे सर प्रोफेसर ए एल मोरे. बी. डी. पांढरे. डी बी मोरे. व्ही ई शिंदे. डॉ दुसंगे सर. प्रोफेसर जीं ए हिरडे. डॉ व्ही बी शिरसाठ मॅडम. एस जाधव मॅडम. वडेपल्ली मॅडम. अनुराधा मते मॅडम. म्हसके सर केदार सर. व कॉलेजचे कर्मचारी उपस्थित होते.

## ॲड सुभाष भोर यांची सहा जिल्ह्यातील कस्टम आणि जीएस टी विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** नुकतीच मा.राष्ट्रपतींच्थ आदेशाने अँड सुभाष भोर यांची स्पेशल पब्लिक प्रॉसिक्युटर म्हणून फेर नेमणूक केली असून आता विशेष भाग म्हणजे नगर नाशिक बरोबरच धुळे जळगाव नंदुरबार जिल्ह्यातील जीएसटी आणि कस्टम्स विभागातील या जिल्ह्यातील वेगवेगळ्या न्यायालयातील केसेस तसेच या संदर्भातील नामदार हायकोर्टातील केसेस चालवण्यासाठी सुद्धा नेमणूक केली आहे.

यापूर्वी नगर आणि नाशिक जिल्हा न्यायालयात सहकारी अँड सौ कोमल गुप्ता आणि अँड चिराग दुसिजा यांच्या सहकार्याने चालवलेल्या केसेसचा विचार करता ही नेमणूक झाली आहे.

ॲड सुभाष भोर हे १९७८ पासून नगर जिल्हा न्यायालयात वकिली करीत असुन नामदार सुप्रीम कोर्टाच्या मेडिएशन मॉनिटरिंग कमिटीद्वारा प्रशिक्षण घेतलेले प्रशिक्षक मध्यस्थ असून मध्यस्थ म्हणून सुद्धा कोर्टातील प्रलंबीत. खटले सामोपचाराने यशस्वीरित्या त्यांनी मिटवलेले आहेत.

तसेच अनेक सामाजिक कामांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग असतो. अहमदनगर जिल्हामराठा विद्या प्रसारक समाज आणि आबासाहेब काकडे शैक्षणिक संकुलाशी सुद्धा त्यांचा संबंध आहे.

## आशा घेऊन आल्या देवीच्या द्वारी दुष्काळ हटवून सुखसमृद्धी येऊ दे घरोघरी

### सहकुटुंब तलवाडा येथे देवीचे दर्शन; शेतकरी बांधवांच्या सुख–समृद्धीसाठी मागितले साकडे

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**शेवगाव–** श्रद्धा, भक्ती आणि जनतेच्या सुख–समृद्धीची मनोमन तळमळ घेऊन शेवगाव नगरपरिषदेच्या नगरसेविका आशाताई खंडू बुलबुले यांनी सहकुटुंब सहपरिवार तलवाडा, तालुका गेवराई, जिल्हा बीड येथे देवीचे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी यंदाच्या दुष्काळाच्या संकटातून सर्वांना सुखरूप बाहेर पडण्याचे बळ दे, अशी भावपूर्ण प्रार्थना देवीच्या चरणी केली.

महाराष्ट्रातील बळीराजा आजही निसर्गाच्या लहरीपणाशी झुंज देत असताना, पावसाच्या प्रत्येक थेंबाची आस लावून बसलेल्या शेतकरी कुटुंबांच्या डोळ्यांत आशेचा किरण निर्माण व्हावा, शेतशिवार पुन्हा हिरवेगार व्हावे, विहिरी आणि तलाव पाण्याने भरावेत, जनावरांना चारा मिळावा आणि सर्वसामान्यांच्या घरात सुखाचे दिवस यावेत, अशी भावना या दर्शनामागे असल्याचे त्यांच्या प्रार्थनेतून अधोरेखित झाले.

दुष्काळ हा केवळ पाण्याचा प्रश्न नसून तो शेतकऱ्यांच्या कष्टांचा, कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा आणि भविष्याच्या चिंतेचा विषय आहे. अशा कठीण परिस्थितीत श्रद्धा माणसाला मानसिक आधार देते आणि संकटांशी लढण्याचे बळही देते. याच भावनेतून आशाताई बुलबुले यांनी देवीच्या चरणी साकडे घालत सर्वांच्या जीवनात सुख, शांती आणि समृद्धी नांदावी, अशी मनोकामना व्यक्त केली. शेतकऱ्यांच्या डोळ्यांतील अश्रू पुसले जावोत, तहानलेल्या धरतीला पावसाची साथ लाभो आणि प्रत्येक घरात आनंद नांदो,' हीच या दर्शनामागील भावनिक भावना असल्याचे या प्रसंगातून प्रतीत होते. समाजाच्या कल्याणाची आस्था आणि संकटातून मुक्तीची आशा यांचा संगम या धार्मिक भेटीतून पाहायला मिळाला.

# 'कलाम यांचे महासत्तेचे स्वप्न पूर्ण करण्याची जबाबदारी युवकांवर' – उपायुक्त लहारे

### अहिल्यानगर महानगरपालिकेत भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांना जयंतीनिमित्त अभिवादन



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** भारताचे माजी राष्ट्रपती, थोर शास्त्रज्ञ आणि युवा पिढीचे प्रेरणास्थान भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या निमित्ताने महानगरपालिकेच्या शाळांमध्ये वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी उपायुक्त मेहर लहारे म्हणाले की, भारत हा युवकांचा देश म्हणून ओळखला जातो. युवकांच्या बुद्धिमत्तेच्या आणि कौशल्याच्या बळावर २१ व्या शतकात भारत महासत्ता बनेल, असे स्वप्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी पाहिले होते. हे स्वप्न पूर्ण करण्याची जबाबदारी आजच्या युवकांवर आहे. युवकांनी डॉ. कलाम यांचा आदर्श अंगीकारून त्यांच्या विचारांनुसार वाटचाल करावी आणि त्यांनी पाहिलेले स्वप्न पूर्ण करण्यासाठी योगदान द्यावे.

डॉ. कलाम यांनी विज्ञान, शिक्षण आणि राष्ट्रनिर्मितीच्या क्षेत्रात मोलाचे योगदान दिले. त्यांचे विचार आणि कार्य आजही देशातील लाखो तरुणांना प्रेरणा देतात. त्यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा करून विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्याचा आणि ज्ञानाचे महत्त्व अधोरेखित करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

अहिल्यानगर महानगरपालिकेच्या शाळांमध्ये वाचन प्रेरणा दिनानिमित्त विद्यार्थ्यांना नियमित वाचनाचे महत्त्व पटवून देण्यात आले. वाचनामुळे ज्ञानाची कक्षा रुंदावते, विचारशक्ती विकसित होते आणि कल्पनाशक्तीला चालना मिळते. विद्यार्थ्यांनी नियमित वाचनाची सवय जोपासून ज्ञानाच्या बळावर उज्ज्वल भविष्य घडवावे, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

अहिल्यानगर महानगरपालिकेत आयोजित अभिवादन कार्यक्रमावेळी उपायुक्त मेहर लहारे यांच्यासह महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. डॉ. कलाम यांच्या विचारांचे स्मरण करून त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

# कष्टाची कदर करून त्यांचा आदर करणे कर्तव्यच - पोंदे

### वृत्तपत्र विक्रेत्यांचा सन्मान करून दिन साजरा

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** ३६५ दिवसांमधून ४ ते ५ दिवस सुट्ट्या वगळता दररोज नित्यनियमाने पहाटेपासून सकाळी येणारे दैनिकासह सायंकाळ चे दैनिकांचे वाटप करून ऊन, पाऊस, थंडी, वारा याची तमा न बाळगता परिश्रम करणारे वृत्तपत्र विक्रेत्यांच्या कष्टाची कदर करून त्यांचा केवळ आजच्या दिवशी आदर न करता रोजच त्यांच्या कार्याला सन्मानाची जोड देणे हे कर्तव्यच असते. असे प्रतिपादन एमआयडीसी येथील उद्योजक ग्रुपचे विश्वनाथ पोंदे यांनी केले.

१५ ऑक्टोबर भारतीय वृत्तपत्र विक्रेता दिनानिमित्त सावेडी उपनगरातील वृत्तपत्र विक्रेत्यांचा सन्मान अहिल्या नगर येथील एमआयडीसी उद्योजक ग्रुप व श्रीराम चौक रिक्षा स्टॉप यांच्यावतीने करण्यात आला. यावेळी उद्योजक विश्वनाथ पोंदे, वाहतूक सेना शहर प्रमुख संजय आव्हाड, प्रवीण घुंगार्डे, दिनेश कुलकर्णी, संजय लावंड, अण्णा चांदकोटी, दीपक खुडे, बाळासाहेब भुजबळ, अरुण ताटी आदी उपस्थित होते.

वृत्तपत्र विक्रेता संघाचे अध्यक्ष गणेश गांधी, उपाध्यक्ष संजय गोरे,प्रसिद्धीप्रमुख विजय मते, दत्ता मारा, सुनील गटणे, अरुण भडांगे, विलास रासकर, प्रत्युम गटणे आदी विक्रेत्यांचा ग्रुपच्या वतीने गुलाब पुष्प देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी गणेश गांधी यांनी सत्काराला उत्तर देताना वृत्तपत्र विक्रेत्यांच्या अडचणी सांगून त्यांच्या कष्टाबद्दल,परिश्रमाची कदर वाचक करतात, विक्रेता व वाचक यांचे जिव्हाळ्याचे नाते असल्याने हा व्यवसाय आज पर्यंत टिकून आहे. याचे आम्हाला समाधान वाटते. एमआयडीसी उद्योजक ग्रुप व श्रीराम चौक रिक्षा स्टाफ यांनी आमचा जो सन्मान केला, आमच्याविषयी जी कृतज्ञता दाखविली, प्रेम व्यक्त केले याबद्दल विजय मते यांनी सर्वांचे आभार मानले.

## भिंगारमध्ये रंगला शाहिरांचा कलगीतुऱ्याचा मेळा; ३५० वर्षांची लोककलेची परंपरा कायम!

### सवाल–जवाब, गौळणी, पोवाडे आणि काव्यात्मक सादरीकरणाने रसिक मंत्रमुग्ध; सरपंच गल्लीमध्ये शाहीरांची मांदियाळी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी




**अहिल्यानगर–** शारदीय नवरात्र उत्सव आणि आई जगदंबेच्या पालखी–पलंग भेटीच्या निमित्ताने भिंगार येथील सरपण गल्लीमध्ये पारंपारिक कलगीतुऱ्याच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत असते. तब्बल ३५० वर्षांची समृद्ध परंपरा लाभलेल्या या लोककला सोहळ्यात जिल्ह्यासह जिल्ह्याबाहेरील दिग्गज शाहिरांनी सहभाग घेतला. शाहिरांचे सवाल–जवाब, काव्यात्मक सादरीकरण, गौळणी आणि पोवाड्यांच्या रंगतदार आविष्काराने उपस्थित रसिक मंत्रमुग्ध झाले. या माध्यमातून महाराष्ट्राच्या पारंपरिक लोककलेचा वारसा जपण्याचा प्रयत्न करण्यात आला.

कार्यक्रमाचे उद्घाटन सौ. शितलताई संग्राम जगताप, भिंगार कॅम्पच्या पोलीस निरीक्षक सौ. तेजश्री थोरात आणि समाजकल्याण अधिकारी सौ. प्रियंका जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष तथा भिंगार कलगीतुरा मंडळाचे अध्यक्ष भाऊसाहेब कर्डिले यांनी उपस्थित मान्यवर आणि शाहिरांचे स्वागत केले.

रात्री साडेआठ वाजता सुरू झालेल्या या कार्यक्रमात सुमारे १७० शाहिरांचा सहभाग असल्याचे आयोजकांकडून सांगण्यात आले. पारंपरिक कलगीतुऱ्यातील सवाल–जवाबांची रंगत, शब्दांची अचूक फेक, काव्यात्मक शैली आणि लोककलेतील वैशिष्ट्यपूर्ण सादरीकरण यामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. नवरात्रोत्सवाच्या उत्साहात पार पडलेल्या या सोहळ्याला लोककलेवर प्रेम करणाऱ्या रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

कलगी आणि तुरेवाले शाहिरांची मांदियाळी

या कार्यक्रमात कलगीवाले शाहीर म्हणून राजेंद्र निमसे, पाराजी पानसंबळ, रामभाऊ सरोदे, विश्वनाथ गुगुळे, बाळासाहेब बोरुडे, एकनाथ पवार आदी शाहिरांनी सहभाग घेतला. तर तुरेवाले शाहीर म्हणून श्री. निजामभाई शेख, कान्हू सुंबे, विठ्ठल भांड, शिवाजीराव ठाणगे, सुभाषराव कावरे, दत्तात्रय झावरे, लक्ष्मण भामरे, शांताराम किंकर, शिवाजीराव वाणी, अण्णासाहेब चौरे, गणेशराव लोंढे, साहेबराव किंकर, जालिंदर भांड, लहुदादा कदम आदी शाहिरांनी आपल्या कलाविष्कारातून रसिकांची दाद मिळवली.

शाहिरांनी गौळणी, पोवाडे, कविता आणि पारंपरिक सवाल–जवाबांच्या माध्यमातून लोककलेचे विविध पैलू सादर केले. त्यांच्या सादरीकरणातून मराठी लोकपरंपरेतील शब्दवैभव, काव्यप्रतिभा आणि सांस्कृतिक वारशाचे दर्शन घडले.

भिंगारमधील कलगीतुऱ्याची सुमारे साडेतीनशे वर्षांची परंपरा आजही जपली जात असल्याने या कार्यक्रमाला ऐतिहासिक आणि सांस्कृतिक महत्त्व प्राप्त झाले आहे. भाऊसाहेब कर्डिले आणि कलगीतुरा मंडळाच्या पुढाकारातून या पारंपरिक लोककलेला व्यासपीठ उपलब्ध होत आहे. नव्या पिढीपर्यंत महाराष्ट्राच्या लोककलांचा वारसा पोहोचविण्याच्या दृष्टीने अशा कार्यक्रमांचे महत्त्व अधोरेखित झाले. यावेळी भाऊसाहेब कर्डिले यांच्यासह रुपेश भंडारी, रावसाहेब कोकणे, राजू अत्तार, महेशशेठ झोडगे, रवी फल्ले, दीपक लिपाणे, अक्षय नागापुरे, राजू परदेशी, आदित्य दिवटे, आसलकर मामा, संदीप फटांगरे, सार्थक साठे, मयंक कर्डिले, कृष्णा फटांगरे आदिसह भिंगार परिसरातील नागरिकांचे कार्यक्रमास सहकार्य लाभले.

## व्हाईट केन डे निमित्त राज्य उपाध्यक्ष संतोष सरवदे यांचा पुरस्कार देऊन विशेष गौरव



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** दिव्यदृष्टी फाउंडेशन आणि शोभा सर्वो दय फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित व्हाईट केन डे निमित्त जिल्हाधिकारी सभागृहात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी सामाजिक व दिव्यांग हक्कासाठी कार्यरत असणारे महाराष्ट्र राज्य (शासन मान्यताप्राप्त) दिव्यांग कर्मचारी संघटना अहिल्यानगर चे राज्य उपाध्यक्ष श्री. संतोष सरवदे यांना विशेष पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

हा पुरस्कार आय लव नगरचे संस्थापक नरेंद्र भाई फिरोदिया, सौ. धनश्रीताई विखे पाटील, ब्रिगेडियर चावला, लायन्स क्लबचे वाधवा, आणि डी. वाय. एस. पी. शिरीष वमने साहेब यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

या सोहळ्यास जिल्हाधिकारी सभागृहात जिल्ह्यातील आयोजक विकास पालवे, कृष्णा तवले त्याचबरोबर अनेक प्रशासकीय अधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

श्री. संतोष सरवदे यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# अहिल्यानगर जिल्हा जाहिरातदार संघटना व ‘फेम’च्या वतीने बालगोपाळांना मदत करून राष्ट्रीय जाहिरात दिन साजरा



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर जिल्हा जाहिरातदार संघटनेच्या वतीने जाहिरात व्यवसायवाढीसाठी प्रयत्न करून सदस्यांसाठी मार्गदर्शनपर कार्यक्रम घेतले जातात. याबरोबरच सामाजिक उपक्रमांचे आयोजन केले जाते. १४ ऑक्टोबर हा दिवस राष्ट्रीय जाहिरात दिन म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्त उत्कर्ष बालघरमधील बालगोपाळांना मिठाई व खेळाचे साहित्य देण्यात आले. समाजातील प्रत्येक घटकाने वंचितांना मदत करून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे असे सांगून यापुढील काळात या संस्थेला सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, असे प्रतिपादन संघटनेचे अध्यक्ष गुलशन अरोरा म्हणाले.

अहिल्यानगर जिल्हा जाहिरातदार संघटना व फेडरेशन ऑफ ॲडव्हर्टायझिंग एन्त्रप्रुनर्स (फेम) यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय जाहिरात दिन साजरा करण्यात आला. यानिमित्त उत्कर्ष बालघरमधील बालगोपाळांना मिठाई, तसेच खेळाचे साहित्य देण्यात आले. यावेळी श्री. अरोरा बोलत होते. याप्रसंगी संघटनेचे उपाध्यक्ष जयंत देशपांडे, सचिव प्रसाद मांढरे, तसेच फेमचे कार्यकारिणी सदस्य राजेंद्र म्याना, किशोर मरकड, प्रमोद गांधी, नितीन देशमुख, सुरेंद्र मुथा, प्रफुल मुथा, आणि ‘उत्कर्षचे युवराज गुंड व सहकारी उपस्थित होते.

‘फेमचे राजेंद्र म्याना म्हणाले की, ‘फेम ही राज्यभरातील जिल्हा जाहिरात संघटनांची शिखर संस्था आहे. ‘फेमच्या वतीने राज्यभर राष्ट्रीय जाहिरात दिन जिल्हा स्तरावर विविध स्तरावर मोठ्या उत्साहात व सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला. ‘उत्कर्षमधील बालगोपाळांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य पाहून आनंद वाटला. सामाजिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या शहरातील विविध संस्थांना संस्थेच्या वतीने, तसेच दानशुरांकडून मदत मिळवून देण्याकामी प्रयत्नशील राहू, असे सांगितले.

ज्येष्ठ सदस्य किशोर मरकड यांनी समायोचित भाषण करून ‘उत्कर्षचे संचालक युवराज गुंड यांच्या कामाचे कौतुक करून बालगोपाळांशी संवाद साधत त्यांना बोलते केले. नितीन देशमुख यांनी मुलांना मार्गदर्शन करीत पुढील वाटचालीसाठी प्रेरणादायी कानमंत्र दिला. सूत्रसंचालन सुरेंद्र मुथा यांनी केले, तर आभार सचिव प्रसाद मांढरे यांनी मानले.

# चौंडी मंत्रिमंडळ बैठक निर्णय प्रत्यक्षात, नगरला शासकीय वैद्यकीय कॉलेज सुरू

## १०० विद्यार्थ्यांचा अभ्यास झाला सुरू

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**





**अहिल्यानगर–** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जन्मगाव असलेल्या चौंडी (ता. जामखेड) येथे दीड वर्षांपूर्वी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अहिल्यानगरला शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्याची घोषणा केली होती. ती आता प्रत्यक्षात आली आहे. नगरच्या सिव्हील हॉस्पिटलमध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे वर्ग सुरू झाले आहेत. १०० विद्यार्थांनी यात प्रवेश घेतला असून, त्यांचे शरीरशास्त्र व जीवशास्त्र अध्यापनही सुरू झाले आहे. नगरला शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू झाल्याच्या घटनेचे विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी स्वागत केले असून, स्वप्नपूर्तीचा विशेष आनंद झाल्याची भावना व्यक्त केली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चौंडीमध्ये राज्यातील पहिली ग्रामीण भागातील मंत्रिमंडळ बैठक ६ मे २०२५ रोजी घेऊन अहिल्यानगर जिल्ह्यात लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्याची घोषणा केली होती. त्यासंदर्भात राज्य सरकार व केंद्र सरकार स्तरावर सर्व प्रक्रिया होऊन अहिल्यानगरमधील जिल्हा शासकीय रुग्णालयात (सिव्हिल हॉस्पिटल) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू झाले आहे. अहिल्यानगरला सुरू झालेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात १०० विद्यार्थ्यांची एम. बी. बी. एस. प्रवेश प्रक्रिया झाली आहे. यात देशभरातील १४ व महाराष्ट्रातील ८६ विद्यार्थी आहेत. त्यांचे शरीर शास्त्र व जीव शास्त्र अध्यापन सुरू झाले आहे. गुणवत्ता यादीनुसार अन्य ठिकाणी प्रवेशाची संधी असताना पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्यासारख्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी अहिल्यानगरच्या शासकीय महाविद्यालयाला पसंती दिली आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या त्रिशताब्दी जन्मोत्सवानिमित्त त्यांच्या नावाने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नगरमध्ये सुरू होण्याची मागणी विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे केली होती. राज्यातील सर्व जिल्ह्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालये आहेत, पण अहिल्यानगरला नसल्याचे त्यांचे म्हणणे होते. त्याची दखल मुख्यमंत्री फडणवीस यांनी घेतली व चौंडीच्या मंत्रिमंडळ बैठकीत त्याची घोषणा केली. त्यानंतर दीड वर्षातच सर्व शासकीय मान्यता प्रक्रिया राज्य व केंद्र सरकारच्या स्तरावर पूर्ण होऊन हे महाविद्यालय नगरला सुरू झाले आहे. जिल्ह्यासाठी ही भूषणावह घटना असल्याची भावना व्यक्त करून सभापती प्रा. शिंदे यांनी हे महाविद्यालय सुरू होण्यासाठी सहकार्य करणारांविषयी कृतज्ञता व्यक्त केली व या महाविद्यालयातून वैद्यकीय अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पूर्ण करून डॉक्टर झालेल्यांकडून प्रभावी रुग्ण सेवा घडेल, असा विश्वास व्यक्त केला आहे.



नवरात्री उत्सवाच्या निमित्ताने नगर – छत्रपती संभाजी नगर रोडवरील जेऊर जवळील नारायण महाराज आश्रमात कोल्हापूर येथील महालक्ष्मी मंदिराची प्रतिकृती तयार करण्यात आली. दर्शनासाठी भाविक दिवसभर गर्दी करीत आहेत. (छाया – विजय मते)

# ब्रिक्स पारंपरिक खेळ संमेलन २०२६ मध्ये अहिल्यानगरच्या उमेश झोटिंग यांचा सन्मान

## अहिल्यानगरच्या शिरपेचात मानाचा तुरा; भारतीय योगासन खेळाला आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचविण्यात मोलाचे योगदान

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** गुजरातमधील अहमदाबाद येथे दिनांक १२ ऑक्टोबर २०२६ रोजी आयोजित ब्रिक्स पारंपरिक व देशी खेळ संमेलन २०२६ या आंतरराष्ट्रीय क्रीडा कार्यक्रमात भारतीय योगासन संघाचे संघ व्यवस्थापक म्हणून महत्त्वपूर्ण जबाबदारी उत्कृष्टरीत्या पार पाडणारे अहिल्यानगरचे श्री. उमेश झोटिंग यांचा सन्मान करण्यात आला.

या आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर भारताच्या पारंपरिक योगासन खेळाची ओळख जगभर पोहोचविण्यासाठी झोटिंग यांनी मोलाचे योगदान दिले. ब्रिक्समधील दहा देशांच्या प्रतिनिधींसमोर त्यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय योगासन संघातील एकूण १५ खेळाडूंनी योगासन खेळाचे आकर्षक प्रात्यक्षिक सादर केले. या प्रात्यक्षिकातून भारतीय योगपरंपरेतील शारीरिक क्षमता, लवचिकता, संतुलन, शिस्त आणि कौशल्य यांचे प्रभावी दर्शन घडले.



झोटिंग यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर बजावलेल्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल श्री रामावतार मानधना चॅरिटेबल ट्रस्टचे ट्रस्टी श्री. मोहन मानधना यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी बोलताना श्री. मोहन मानधना यांनी सांगितले की, ‘‘ही अहिल्यानगर जिल्ह्यासाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे. उमेश झोटिंग सरांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर योगासन खेळासाठी केलेले कार्य कौतुकास्पद आहे. त्यांच्या प्रदीर्घ अनुभवाचा आणि मार्गदर्शनाचा अहिल्यानगरमधील योगासन व मल्लखांब खेळाडूंना निश्चितच मोठा फायदा होईल.’’ या सत्कारप्रसंगी महावीर मल्लखांब आणि योगा ट्रेनिंग सेंटरच्या प्रशिक्षिका प्रणिता तरोटे कवडे, आप्पा लाढाणे, अक्षय पावडे, प्रवीण पाटील यांच्यासह सेंटरचे खेळाडू, पालकवर्ग आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

अहिल्यानगरच्या मातीतून घडलेला एक क्रीडा प्रशिक्षक आंतरराष्ट्रीय स्तरावर भारतीय योगासन खेळाचे प्रतिनिधित्व करतो, ही संपूर्ण जिल्ह्यासाठी अभिमानाची आणि प्रेरणादायी बाब आहे. उमेश झोटिंग यांच्या या यशामुळे अहिल्यानगरच्या क्रीडा क्षेत्राची मान उंचावली असून, आगामी काळात अनेक खेळाडूंना आंतरराष्ट्रीय स्तरावर झेप घेण्यासाठी प्रेरणा मिळणार आहे.

# संस्कृत भाषा ही आपली संस्कृती आहे - श्रीकांत नांदापूरकर

## मेहेर इंग्लिश स्कूलमध्ये स्त्री शक्तीचा जागर व श्री सुक्तम् चे सामुदायिक पठण



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शारदीय नवरात्र उत्सव हा पावन पर्व आहे. या काळात स्त्री शक्तीचा जागर सर्वत्र होत असतो. प्रत्येकाच्या घरामध्ये आई, बहीण, आत्या, मावशी, काकू, आजी या नात्यांमध्ये आपला समाजातील नातेसंबंध टिकून आहेत. भारत मातेला देखील आई म्हणून संबोधले जाते. मुलींनी किंवा महिलांनी कोणतेही संकट आल्यास न डगमगता सामोरे जाणे आवश्यक आहे. नवरात्र उत्सवानिमित्त देवीची उपासना करण्यात यावी. देवी लक्ष्मीचे श्रीसूक्तम् हे संस्कृत श्लोक असून या श्लोकाच्या पठणाने मुलांची बुद्धी तीव्र होते, तसेच पाठांतर क्षमता आणि एकाग्रता वाढते. संस्कृत भाषा ही आपली संस्कृती आहे, ती प्रत्येकाने जोपासावी, असे प्रतिपादन विश्व हिंदू परिषदेचे मंदिर अर्चक पुरोहित आयामाचे जिल्हाप्रमुख श्रीकांत नांदापूरकर यांनी केले.

हिंद सेवा मंडळाच्या मेहेर इंग्लिश स्कूलमध्ये विहिंपचे मंदिर अर्चक पुरोहित आयामाचे वतीने शारदीय नवरात्रौत्सव निमित्त स्त्री शक्तीचा जागर या उपक्रमा अंतर्गत श्री सुक्तम् पाठाचे सामुदायिक पठण करण्यात आले.

याप्रसंगी विहिंपचे मंदिर अर्चक पुरोहित आयामाचे विभाग प्रमुख गजेंद्र सोनवणे, जिल्हाप्रमुख श्रीकांत नांदापूरकर,विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा प्रसिद्धी प्रमुख अमोल भांबरकर, अरुण खिची,प्राचार्य प्रा. अनुरीता झगडे आदींसह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

प्राचार्य प्रा. अनुरीता झगडे म्हणाल्या, ‘‘शाळा ही केवळ पुस्तकी ज्ञान देणारी संस्था नसून संस्कार केंद्र आहे. नवरात्र उत्सवाच्या निमित्ताने आम्ही विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास, स्वाभिमान आणि भारतीय संस्कृतीची जाणीव जागृत करण्याचा प्रयत्न करत आहोत. श्री सुक्तम् पठणासारख्या उपक्रमांमुळे मुलींमध्ये सकारात्मक ऊर्जा, शिस्त आणि एकाग्रता वाढते. आमच्या शाळेतील प्रत्येक विद्यार्थिनी हीच उद्याची सक्षम स्त्री शक्ती आहे.

# न्यू आर्ट्स महाविद्यालयात ‘वाचन प्रेरणा दिन’ साजरा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालय (स्वायत्त), अहिल्यानगर येथे ग्रंथालय विभागाच्या वतीने डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. यानिमित्त महाविद्यालयात नवीन पुस्तकांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांच्या हस्ते झाले.

यावेळी प्राचार्य डॉ. सागडे यांनी महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील विपुल ग्रंथसंपदेची माहिती दिली. ग्रंथालयात लाखो ग्रंथ आणि संदर्भग्रंथ उपलब्ध असून, विषयानुसार पुस्तकांची मांडणी करण्यात आली आहे. संदर्भसाहित्य विभागात शब्दकोश, विविध विषयांचे ज्ञानकोश, विश्वकोश, मार्गदर्शिका तसेच दुर्मिळ वाचनसाहित्याचा समावेश आहे.



या साहित्याचा विद्यार्थ्यांनी अभ्यासासाठी, ज्ञानार्जनासाठी आणि विशेषतः स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी अधिकाधिक उपयोग करून घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

वाचनामुळे ज्ञानाच्या कक्षा रुंदावतात आणि व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, त्यांना नव्या पुस्तकांची ओळख व्हावी आणि अभ्यासासाठी संदर्भसाहित्य उपलब्ध व्हावे, या उद्देशाने नवीन पुस्तकांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना विविध विषयांवरील पुस्तकांची माहिती मिळाली.

कार्यक्रमास वाणिज्य शाखेचे उपप्राचार्य डॉ. संजय कळमकर, विज्ञान शाखेचे उपप्राचार्य डॉ. अनिल आठरे, ग्रंथपाल संगीता निमसे, प्रबंधक बबन साबळे, अधीक्षक आर. एन. पाटील, अधीक्षक जे. जी. सावळे यांच्यासह महाविद्यालयातील विविध विभागांचे प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

(पान १ वरून)

### अवैध दारू विक्रीवर कारवाईत साडेसात लाखांचा मुद्देमाल जप्त

या पथकांनी वेगवेगळ्या ठिकाणी छापे टाकून चार जणांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमानुसार गुन्हे दाखल केले. यामध्ये बेलवंडी हद्दीत राजेंद्र सदाशिव जवक (रा. रांजणगाव मशीद, पारनेर) याच्याकडून सर्वाधिक ६ लाख २५ हजार ५१० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पाथर्डी हद्दीत महेश विष्णू दराडे (रा. पागोरी पिंपळगाव) याच्याकडून ४१ हजार १८० रुपये, सोनई हद्दीत सागर रामदास डुकरे (रा. खुपटी, नेवासा) याच्याकडून ७३ हजार ५०० रुपये, तर श्रीगोंदा हद्दीत नितीन जालिंदर बोरकर (रा. निमगाव खलू) याच्याकडून १६ हजार ३०० रुपयांचा अवैध दारूचा साठा जप्त करण्यात आला.

### दोघा सराईत दुचाकीचोरांना कोतवाली पोलिसांकडून बेड्या

गेली होती. तसेच, १२ ऑक्टोबर रोजी नगर कॉलेजशेजारील झुडिओ मॉलच्या पार्किंगमधून संपत मांजरी यांची होंडा शाईन (एमएच.१४ इक्यू १७६०) चोरीस गेली होती. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले होते. गुन्हे शोध पथकाने सीसीटीव्ही फुटेज आणि गोपनीय माहितीच्या आधारे तपास करून १३ ऑक्टोबर रोजी संशयित संदीप शिवाजी घायमुक्ते (वय ३९, रा. वाकोडी रोड, अहिल्यानगर) याला विनाक्रमांकाच्या सुझुकी ॲक्सेससह ताब्यात घेतले.। ोत्याच्याकडे कसून चौकशी केली असता ही गाडी चोरीची असल्याचे निष्पन्न झाले.

दुसऱ्या कारवाईत १४ ऑक्टोबर रोजी पेट्रोलिंग करत असताना संशयित सचिन भाऊसाहेब तेलोरे (वय ३६, रा. वाळकी, ता. नगर) याला मार्केट यार्ड परिसरातून ताब्यात घेण्यात आले. त्याने उडवाउडवीची उत्तरे दिल्याने त्याला पोलीस ठाण्यात आणून पोलिसी खाक्या दाखवताच त्याने झुडिओ मॉल परिसरातून होंडा शाईन चोरल्याची कबुली दिली. तसेच, त्याच्याकडून यापूर्वी चोरलेली आणखी एक विनाक्रमांकाची हिरो स्प्लेंडर हस्तगत करण्यात आली. पुढील तपास पोना उमेश गायकवाड आणि पोकॉ सोमनाथ केकाण करत आहेत.

कारवाई करणारे पथक

या कारवाईत पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलबुर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे आणि कोतवालीचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाचे सपोनि विशाल चिटणीस, पोहेकॉ बाळकृष्ण दौंड, साबीर शेख, राहुल शिंदे, विनोद बोरगे, विशाल दळवी, अशोक काळे, पोना उमेश गायकवाड, पोकॉ सोमनाथ केकाण,
शिरीष तरटे, सुरज कदम, अतुल कोतकर, संदीप शिरसाठ, संकेत धिवर, रमेश शिंदे, अतुल लाटे, वैभव काळे, आकाश काळे, सत्यम शिंदे, तसेच दक्षिण मोबाईल सेलचे राहुल गुंडू व अरुण सांगळे यांनी सहभाग घेतला.

### कोटक महिंद्रा बँकेतील अपहारप्रकरणी चार वर्षांपासून फरार आरोपी बेलवंडी पोलिसांच्या जाळ्यात!

मात्र, वसूल केलेली रक्कम बँकेत जमा न करता परस्पर वापरल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. या दोघांनी मिळून ७ लाख ३१ हजार ९२० रुपयांचा अपहार केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. त्यापैकी सागर शिंदे याच्याशी संबंधित ३ लाख ३८ हजार ७३० रुपयांच्या अपहाराचा आरोप आहे.या प्रकरणी भारतीय दंड विधानाच्या कलम ४०९, ४२० आणि ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.
गोपनीय माहितीवरून पोलिसांची कारवाई
गुन्हा दाखल झाल्यानंतर सागर शिंदे फरार होता. त्याचा शोध सुरू असताना बेलवंडी पोलिसांना त्याच्याबाबत गोपनीय माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून त्याला ताब्यात घेत अटक केली. त्यानंतर पुढील तपास आणि कायदेशीर कारवाईसाठी त्याला एमआयडीसी पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले.
वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पथकाची कामगिरी
ही कारवाई पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कल्लूबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुजितकुमार क्षीरसागर आणि बेलवंडी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या कारवाईत पोलीस हेड कॉन्स्टेबल दादासाहेब क्षीरसागर, पोलीस हेड कॉन्स्टेबल भाऊसाहेब यमगर, पोलीस हेड कॉन्स्टेबल गाडीलकर आणि पोलीस कॉन्स्टेबल विनोद पवार यांच्या पथकाने सहभाग घेतला.

### विद्याधामच्या मुलींचा कबड्डी स्पर्धेत डंका!

प्रतिनिधित्व करणार आहे. १९ वर्षांखालील मुलींचीही चमकदार कामगिरी
१९ वर्षांखालील मुलींच्या संघानेही स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत उपविजेतेपद पटकावले. या संघातील श्रावणी टिळेकर, नागेश्वरी वाघमारे, प्रीती पवार, प्रांजल धोत्रे, सायली गायकवाड, काजल शेलार आणि सानुका कोरके यांनी आपल्या खेळातून सर्वांचे लक्ष वेधून घेतले.
मार्गदर्शकांचे कौतुक; खेळाडूंवर अभिनंदनाचा वर्षाव
या सर्व खेळाडूंना क्रीडाशिक्षक संदीप घावटे, अमोल कातोरे, कांता मांडगे आणि सोनाली वाघमारे यांचे मार्गदर्शन लाभले. खेळाडूंच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष धरमचंद फुलफगर, सचिव नंदकुमार निकम, शाळा समितीचे अध्यक्ष चंदुलाल चोरडिया, क्रीडा समितीचे अध्यक्ष सचिन जामदार, मुख्याध्यापक पी. जे. मेरगळ, पर्यवेक्षक एन. एस. डुंबरे, संजय देशपांडे आणि के. बी. काळे यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले. तसेच आगामी जिल्हास्तरीय आणि विभागीय स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या. विद्याधामच्या मुलींनी मिळवलेले हे यश प्रशालेसाठी अभिमानास्पद असून, त्यांच्या कामगिरीमुळे देवदैठणच्या क्रीडा क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.